
आकाश
आसावरी काकडे




# आकाश


आसावरी काकडे



सेतू प्रकाशन

पुणे ४११०५२



आकाश

कविता संग्रह : आसावरी काकडे

प्रकाशक :
श्रीनिवास काकडे
“सेतू प्रकाशन”
स्टेट बैंक नगर, कर्वेनगर,
पुणे ४११०५२
फोन: ९४२१६७८४८० / ९७६२२०९०२८


सर्व हक्क सुरक्षित

मुखपृष्ठ
श्री. चंद्रकांत मांडरे
“निसर्ग”, राजारामपुरी ७, कोल्हापूर

मुद्रणस्थळ
स्टेप इन सर्विसेस
४७ ब, तोफखाना चौक,
पुणे ४११००५

पहिली आवृत्ती- १५ ऑगस्ट १९९१
ई पुस्तक- .... २३ जानेवारी २०२२

मूल्य :- रुपये ३०/-




आकाश

हा कवितासंग्रह ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान कवयित्री सौ. आसावरी काकडे यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही सेतू प्रकाशनचे श्री. श्रीनिवास काकडे यांचे आभारी आहोत.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237



कुणी म्हणाले
तुझ्या कवितेत
नेहमी आकाशच असते !
मी म्हणाले
आकाश नसते कुठे ?




**मनोगत**

‘आरसा’ नंतरचा
‘आकाश’ हा माझा दुसरा कवितासंग्रह.
कवितेबरोबरच्या प्रवासात या वळणापर्यंत
अनेक सुहृदांची उमेद वाढवणारी सोबत मला मिळाली.
वडीलधाऱ्यांचे कौतुक आणि आशीर्वाद लाभले,
आणि मान्यवरांचे प्रोत्साहन देणारे मार्गदर्शन झाले.
या सर्वांच्या मन:पूर्वक जिव्हाळयाने
मला थांबू दिले नाही. मला चालण्याचे श्रेय मिळाले !
आता चालत राहण्यावरची माझी श्रद्धा वाढली आहे.
मनाला उभारी आहे आणि पावलांना दिलासा !
या पुढील प्रवासातही
ही न संपणारी शिदोरी माझ्या सोबत असेल
या विश्वासाबरोबरच
या साऱ्यांविषयीचा कृतज्ञ भाव मनात जागतो आहे.
हे सारं जिवापाड जपत
तुमच्या साक्षीन मी चालत राहीन...
*

१५ ऑगस्ट १९९१ रोजी हा कवितासंग्रह प्रकाशित झाला होता. त्याच्या छापिल प्रती आता उपलब्ध नाहीत. म्हणून आता तो ई-पुस्तक रूपात प्रकाशित करावा असं मनात आलं. ई साहित्य प्रतिष्ठानच्या सुनीळ सामंत यांनी या कल्पनेला दुजोरा दिला आणि प्रकाशनाची जबाबदारी स्विकारली. त्यांच्या हार्दिक सहकार्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देते.


आसावरी काकडे





# अनुक्रम


१) आकाश
२) बरंच झालं !
३) मेणा
४) कधी कधी
५) ऐलतटावर
६) शब्दांनो,
७) साद
८) बहर
९) शब्द काही
१०) म्हणे...
११) एकदा
१२) समजाव ना
१३) कणिका
१४) दिसून जा
१५) प्रश्न
१६) तेव्हा कुठं
१७) चालता चालता
१८) नको ना
१९) समज ?
२०) खूण
२१) त्या वळणाने
२२) भेट
२३) थांब जरा
२४) बदल
२५) ओळख




२६) दखल

२७) गीत

२८) आता

२९) स्वर्ग

३०) पायखुणा

३१) आव्हान

३२) सहज

३३) बंध

३४) नकोशी

३५) अरूप तोवर

३६) संधी

३७) हुरहुर

३८) नाईलाज

३९) कणिका

४०) तहान

४१) मोर तुझा

४२) शब्दघट

४३) दिलासा

४४) वाट

४५) मनाच्या रंगमंच्यावर

४६) मला भेटले....

४७) अनुभव

४८) ओंजळ भरली


४९) क्षण

५०) प्रकाशाचे नाग

५१) आठवणी

५२) माझ्याही पल्याड

५३) कणिका



५४)  छंद

५५)  वा !

५६)  तरीही

५७)  समाधान ?

५८)  तोवर

५९)  काहीसे

६०)  सोबत


६१)  जाणीव





**आकाश**

झुल्यावर बसून
उंच उंच झोके घेताना
कधी कधी
आकाश अगदी जवळचं,
मायेची पाखर घालणाऱ्या
आईसारखं वाटतं
तर कधी
खूप दूरचं, परकं
निर्गुण निराकार वाटतं !
झुल्याच्या झुलव्या बरोबर
मनाचेही आकार बदलत असतात
त्याला आकाश तरी काय करणार ?
***





**बरंच झालं !**

माझ्या कळ्यांना
तू न फुलण्याचा शाप दिलास
ते बरंच झालं
बहर आवरणं
मला शक्यच झालं नसतं !
माझ्या मनात
तू अबोलीच पेरलीस
तेही बरंच झालं
सुगंध लपवणं
मला अशक्यच झालं असतं !!
***






## मेणा

डोळ्यांत तरारुन आला
अश्रूचा इवला थेंब
जग धूसर झाले तेव्हा
कायाही गेली लांब

मी होते तशीच होते
काही ना कळले कोणा
अश्रूच्या अल्याड होता
व्याकूळ सखीचा मेणा

तिज मीच घातली होती
ती साद आर्त हाकांनी
सामोरी जाउ न शकले
पण मातीच्या हातांनी


डोळ्यांत तरारुन आला
मग थेंब अश्रुचा इवला
मी सावरले जग तेव्हा
तो मेणा निघून गेला..!
***





## कधी कधी

मुसळधार पाऊस पडून गेला तरी
प्रत्येक वेळा
आकाश निरभ्र होतंच
असं नाही !
दु:खाचा जिवंत झरा
उरात बाळगून ओथंबलेले
काही ढग
आकाशालाही पेलवत नाहीत
कधी कधी
***






**ऐलतटावर**

कुठे हरवले होते नकळे
आज अचानक सापडले
उजेडात या काळोखाचे
अर्थ नव्याने उलगडले

काळोखाचे दालन खुलता
चंद्र चांदणे लुटले मी
पुन्हा पुन्हा हरवून नव्याने
मलाच शोधत बसले मी !

इथे क्षणांच्या ऐलतटावर
काय नेमके सळसळले ?
रंग रेशमी, गंध केशरी
नाद लेवुनी दरवळले !


कोणाचे ते रूप निरामय
आकारातून ओघळते ?
युगायुगांच्या पैलतटीचे
ऐलतटावर आढळले !
***





**शब्दांनो**

शब्दांनो,
काठावर बसून मजेत पाय हलवताना
मधून मधून अंगावर उडणारे तुषार
तसं तुमचं आस्तित्व
इतकंच जाणवलं होतं !
काठावरून परतताना तर
तुषार सुकून जावेत इतकं सहज आहे
तुमचंही मिटून जाणं असं वाटत होतं !
पण एकदा-
काठावरून पाहिलं, कुणी एक
खोलच खोल सूर मारून उंच उंच जात होता
हाती लागता लागता पार क्षितीजाला भिडत होता
किनारा नसलेला तो जलाशय
आणि
जाणिवेची दालनं दुरून उघडण्याची किमया करणारी
ती जलक्रीडा
भान हरपून पहात असताना
अंगावर उडालेले काही तुषार
थेट आत आत पोचले
नि जाणीवेचे नेत्र
शब्दांनो,
तुमच्या अथांग दर्शनाने पाझरू लागले !
***





**साद**

कुण्या अंधाराचे भय होते घेरत मनाला
झरणाऱ्या अश्रुंनाही माझा लळा लागलेला

सारे आनंदाचे क्षण जात होते मालवून
आणि बघता बघता येत होते अंधारून

मग आधीचा अंधार होई गडद गडद
आणि पुसूनिया जाई खोल मनातली साद

कात टाकून नव्याने जन्म घेतला मागून
नव्या उभारीने पुन्हा पाहू म्हटले जगून

तसा प्रकटला मनी मंद तेवणारा दीप
आणि काळोख कधीचा उजळला आपोआप

आता घुमतो कानात एक अनाहत नाद
कवितेच्या जन्माआधी जणू कवितेची साद !
***





**बहर**

माझ्या बहराला
कागदी म्हणून
माझा आनंद
केविलवाणा करू नकोस !
बहर वेलीवर नाही
मनात फुलावा लागतो
हे तुला कसं समजेल ?

खोडाचा भक्कम आधार
बहर पेलत असतो
ही खुळी समजूत !
खरं तर
बहरच खोडाला सावरत असतो
जगवत असतो !
किती केविलवाणं दिसतं
नुसतं खोड ! !
***





## शब्द काही

सावराया धावणारे शब्द काही
अर्थ केव्हा झाकणारे शब्द काही


वर्दळीतिल रोजचे ते आपुलेसे
आप्त जिवलग भासणारे शब्द काही

बातम्यातिल माणसासम दुरुन थोडी
तोंडओळख दावणारे शब्द काही

प्राशिली ना अमृताची माधुरी मी
ओढ तैसी लावणारे शब्द काही

मोर नाही पाहिले नाही चकोरा
गात तैसे नाचणारे शब्द काही


भोवती माझ्या हजारो शब्द ऐसे
आर्ततेने उमलणारे शब्द काही
***





**म्हणे...**

म्हणे
या वळणावरून पुढे गेलं
की एक मोहनगरी लागते
जिथं मोह पडणं हा गुन्हा नसतो !
पार्थिव सुखात डुंबून जाण्यातही
पुरुषार्थ असतो
जुनं सारं विसरून जायची
तिथं पूर्ण मुभा असते,
नव्हे, खरं तर तीच अपेक्षा असते !
नव्या स्वप्नांचे तांडे
राजरोस फिरत असतात तिथं
जुन्या स्वप्नांच्या पाचोळयांचा
मागमूसही नसतो तिथं !
आणि मी तर-
माझ्या अर्ध्यामुर्ध्या स्वप्नांचं
अख्खं गाठोडंच
शिदोरी म्हणून बरोबर घेतलंय
या वळणावरून पुढे जाताना !
***





## एकदा

आले दारात आकाश, आले घरात आकाश
झाली पृथ्वीही आकाश, झाले आकाश आकाश

नेत्र उघडता दिसे सारे भोवती आकाश
होता अतर्क्याचा स्पर्श, आत मनही आकाश

क्षणकाल पेलले मी घरी आलेले आकाश
मन जडावले आता कसे आवरू आकाश

मग किरणांचे हात घेती कवेत आकाश
उजळती चराचर सारा प्रकाश प्रकाश


तसा क्षणात पडला लख्ख मनात प्रकाश
होते धुकेच नुसते खाली आलेले आकाश !
***





**समजाव ना**

किती सहज उतरवून ठेवलीस तू
पिकलेली पानं
हिरव्याच्या स्वागतासाठी !
मी मात्र
उगीच केली खळखळ
नि आता आपसुक होत असलेल्या
पानगळीला घाबरते आहे !
किती सहज गृहीत धरलंस
तू हिरव्याचं आगमन
आणि गिळून टाकलीस पानगळ !
मला मात्र
पानगळच गिळते आहे !
आपसुकच होईल
हिरव्याचं आगमन
हे मलाही समजाव ना !
***






## कणिका

थोडी आत थोडी बाहेर
सगळं जगणंच आत-बाहेर !
थोडी तळयात थोडी मळयात
सारी गाणी तळयात-मळयात ! !
***

युगायुगांच्या प्रतिक्षेनंतर
क्षणासाठी आलीस
आणि
निवालेल्या मनांत
वेदना पेरून गेलीस !
***


तुझ्यात अडकलेले सगळे श्वास
हळुहळु सोडवून घेतले
तरी प्रत्येक निश्वासावर
अजून तुझेच नाव आहे !
***





# दिसून जा


पिकल्या पाना
जरा पोपटी
रंग मनाचा देउन जा
शिणल्या हाती
आशिश थोडे
प्रसाद म्हणुनी घेउन जा
भरल्या नेत्री
अश्रू होउन
सार्थक सारे पाहुन जा
थकल्या गात्री
एक दिलासा
स्पर्शामधुनी पेरुन जा
सरले सारे
भोग पाडसा
निश्वासापरि हसून जा
उरले थोडे
श्वास राजसा
एकदा तरी दिसून जा !
***





## प्रश्न


आयुष्यावरून
संवत्सरांचे पापुद्रे निसटत जातात
तसतशी कर्तुत्वाची आवरणं
एक एक करत निखळून पडतात !
देठाची पकड निर्जीव झाल्यावर
पाकळया गळू लागाव्यात
तसे, मग वितळून जातात
प्रेम, आदर, निष्ठांचे गोंडस मुखवटे !
नि केसरही उडून गेलेल्या
सुकल्या देठासारखा
उघडा पडतो कर्तव्याचा रखरखीत चेहरा !
मातीशी इमान राखत
संस्कृतीचा बुंधा ताठ उभा नसता
तर कर्तव्याचा मुखवटा फाडून
सत्याचा कुठला चेहरा प्रकटला असता ?
***





## तेव्हा कुठं

अस्वस्थतेचं अग्नीकुंड
एकसारखं पेटतं ठेवावं
तेव्हा कुठं
अग्निशलाकेसारखी
कविता प्रगट होते !
तिच्या हातातील
तृप्तीचा कलश मात्र
आपल्याला
हाती धरवत नाही ! !
***





## चालता चालता

चालता चालता
ती वाटेचीच झाली !
मन भरून श्वास घ्यावा
नि रेंगाळावं क्षणभर
एखाद्या रानफुलाशी
तर तिनंच वाटेला गती दिलेली !
मागे परतावं
तर मागचे दोर केव्हाच कापलेले
नि सहज कुठे डोकवावं
तर सगळ्या वाटा काचेच्या पलीकडे !
दिसतात पण शिवता येत नाहीत !
मग ती चालतच राहिली
चालता चालता
स्वतःच वाट झाली !
***





**नको ना**

नको ना मला साद घालू अशी तू
नको लाघवी गीत गाऊ अशी तू


मनी दाटलेल्या मुक्या भावनांच्या
सतारी नको आज छेडू अशी तू

तुझ्या स्वागता ना दिवा आज दारी
नको ज्योत त्यातील मागू अशी तू

जरी हासती नेत्र पाणावलेले
नको आर्तता त्यात शोधू अशी तू

तुला साथ द्यावी असे भाग्य कोठे
नको वाट केव्हाच पाहू अशी तू

तसा मागूनी चंद्र हाती न येतो
नको चांदणी रात्र जागू अशी तू
***





**समज ?**

तुझ्याशी वाद करताना
आताशा माझा आवाज
तितकासा चढलेला नसतो
आणि तुझी प्रतिक्रियाही
झोंबण्याइतकी तिखट नसते !
तुझ्या मागोमाग निमुटपणे येताना
मी फारशी खळखळ करत नाही
पण कधीतरी मी यायचं नाकारलंच
तर तूही हट्ट धरत नाहीस
तुझ्या निशिगंधाचं मला अप्रुप वाटावं
यामुळं तू भारावून जात नाहीस
नि मी लावलेल्या गुलाबाची
मला हवी तशी दखल
तू घेतली नाहीस तरी
मीही हळवी होत नाही !
आपल्या हातून निसटून गेलेल्या संवत्सरांनी
जाता जाता समंजसपणाची शाल
आपल्यावर पांघरली आहे ?
की बरेच श्रावण बरसून गेल्यावर
आता सरावाने कोसळणाऱ्या पावसात
तितकासा आवेग उरलेला नाही ?
***





## खूण

माझ्या नावाची पाटी धुरकट झाली
म्हणून मी
ती काढून ठेवली आहे !
एकेकाळच्या तिच्या झिलईची खूण
लक्षात ठेवून
तू माझं घर शोधू लागलीस
तर चुकशील
म्हणून सांगितलं !
नावाखेरीज आणखीही काही
तुझ्या लक्षात आहे ना ?
किमान
आपण अर्धी अर्धी वाटून घेतलेली
बकुळीची माळ ?
खुणेसाठी तीच आठवण बरोबर घेऊन ये
फुलं सुकली असली
तरी गंध आता अधिक गर्द झाला आहे
तू लगेच ओळखशील !
***





## त्या वळणाने

त्या वळणाने काल भेटुनी
या वाटेला गाव दिले
या वाटेने जाता जाता
त्या गावाला नाव दिले

नाव देउनी नकळे कोठे
वाट खळाळत गेली ती
नकळे कसली ओढ अनावर
मना लावुनी गेली ती

त्या ओढीने पळत राहिले
मुठीत घेउन क्षितिजखुणा
नाव-गावही होते हृदयी
परंतु नव्हत्या पायखुणा

एकाकीपण सवे घेउनी
कुठे जायचे किती कसे?
पायतळीची वाट सरकती
थांबायाचे इथे कसे?
***





## भेट

माझ्यापाशी रंग आहेत
त्यात प्राण भरण्यासाठी
गंधकुपी भेट दे
उमलण्यासाठी
माझ्या कळीला
एक हिरवा देठ दे !
माझ्यापाशी अंधार आहे
त्यातून रत्न वेचण्यासाठी
थोडा निळा प्रकाश दे !
चमचमण्यासाठी चांदणीला
एक छोटं आकाश दे !
***






**थांब जरा**

थांब जरा घाइ नको इतुक्यातच फुलण्याची

कोवळेच देठ अजुन
केसरही इवलेसे
मन वेडे आवरना
पान पान सांगतसे
अंतरात जागू दे आस रंग भरण्याची

फुलवित पर येणाऱ्या
पाखरास दूर ठेव
नाजुकशा रंगांच्या
पाकळ्या मिटून ठेव
ओसंडून वाहू दे गंधकुपी हृदयाची

तडफडती बेचैनी
हळूहळू उलगडेल
हुंकारत प्राणगंध
चोहिकडे दरवळेल
फूल तुझे गुणगुणेल ओळ नव्या गाण्याची
***





**बदल**


आपल्या घराच्या खिडकीतून
सहज दिसणारे
बुचाच्या फुलांचे झाड
त्यावरचा बहर
आणि सुखावणारा गंध
याबद्दल
तू भारावून सांगू लागलास
तेव्हा मी सकाळच्या बातम्या ऐकत होते !
आपापले किनारे सोडून
एकमेका सन्मुख चालता चालता
आपण किनारेच बदलले की !
**





## ओळख

एखाद्या चित्रकाराने
एखाद्या पोर्टेटची नुसती आउटलाईन काढावी
तसे रिकामे असते आपले आयुष्य किती तरी काळ !
नुसती आउटलाईन काढणारा
तो चित्रकार अज्ञात असतो
पण
त्यात बाकीचा तपशील स्नेहाने भरणारे
त्याला रंगरूप देणारे
डोळ्यांत स्वत्वाची ओळख पेरणारे
सारे आप्त जिवलग, सुहृद
परिचित-अपरिचित
फुलं, पक्षी, धरती आणि
आकाश सुद्धा
प्रत्येक क्षण समृद्ध करतात
तेव्हा कधीतरी आपल्यालाही
नकळत गवसतो आपला श्वास
नि सरसावतो आपण
सेल्फ-पोर्ट्रेट पुरे करण्यासाठी !
***






## दखल

पांघरून धुके धुके
आज आभाळ रुसले
नाही कुठेही चैतन्य
नाही फटीत हसले

नाही उधळले रंग
नाही तेज पसरले
कसे उदास उदास
आज सारे विसरले

आपापल्या घरट्यात
तरी जग जागे झाले
काय झाले आभाळाला
नाही कुणीही पुसले
***






## गीत

नको म्हटले तरीही जीव गुंतला तुझ्यात
होते जायचे निघून कुणा कळायच्या आत

आता हसावे वाटते सुख झेलावे वाटते
थांबलेल्या पावलांना आता चालावे वाटते
तुझ्या सोबतीचा दिवा मंद तेवतो मनात

रुसलेले सारे क्षण गेले खंत विसरून
नव्या स्वरांसवे येई गीत ओठात जुळून
तुझ्या लाघवी बोलांची साद घुमते कानात

झुला दिवसाचा झुले तुझ्या वेल्हाळ लयीत
आणि रात्र दरवळे जाईजुईच्या श्वासात
मन बहरले कसे मला कळायच्या आत !
***





## आता

प्रश्नांचे तीर चुकवत
दुःख पायाखाली घेऊन
सहानुभूतीच्या शब्दांपासून कुठे तरी दूर
निघून जाऊ लागले
तर पायाखालचं दुःख वाटभर झालं !
....
मग मी काय केलं सांगू ?
दुःख शिरावर घेऊन मिरवू लागले
प्रश्नांचे तुरे शिरपेचात खोवून दिले
आणि सहानुभूतीचे शब्द ठेवून घेतले !
आता
वाटेल तेव्हा
प्रश्नांचे तुरे फेकून देऊन
शब्दांची टरफलं फुंकून टाकून
दुःख हृदयापाशी घेते
आणि त्याला
अश्रूंनी न्हाऊ घालते !
***





## स्वर्ग

गवसले आकाश माझे
आज माझ्या अंगणी
पौर्णिमा आता निरंतर
आणि हसरी चांदणी

सहज मी एका ढगावर
स्वार झाले हासुनी
चांदणे हातात आले
अन निघाले उजळुनी

त्या प्रकाशी समजले की
स्वर्ग नव्हता अंगणी
तेच होते उंच गेले
ही धराया चांदणी

आणि हेही समजले की
दूर आहे स्वर्ग तो
दर नव्या टप्प्यास वाटे
गवसलेला स्वर्ग तो

हेहि नाही थोडके पण
आज दिसला मार्ग तो
या नभाने दाविला ना
त्या नभाचा पैस तो !
***






## पायखुणा

पायखुणांना या किती पाय होते
पाऊलामागुते कोण जाई ?

पुढे गेलेल्यांच्या पाउलांचे ठसे
भेटतात असे वाटेवर

कुणा एकालाच श्रेय देऊ नये
शब्द बांधू नये एका अर्थी

प्रत्येक जाण्याने गर्द होती खुणा
लाभतात कुणा दिशा त्यात !
***





**आव्हान**

तुझ्याजवळ आहेत
भरभरून सांगाव्यात
अशा विजयकथा
माझ्याजवळ
हरलेल्यांच्या
व्याकुळ आठवणी !
तुझ्याजवळ आहेत
सुंदर शिल्पं
माझ्याजवळ
अनघड दगड !
तुझ्याजवळ आहे समाधान
माझ्याजवळ आव्हान ! !
***





**सहज**

तुझा पिसारा
फुललेला राहावा म्हणून
माझ्या पिसाऱ्यातले
एक एक पीस खुडून
तुझ्या गळणाऱ्या पिसाजागी
तुलाही नकळत मी खोवत राहीन
असं म्हणणं सोपं
नि आदर्शही कदाचित !
पण
आपलं पीस उपटून काढताना
होणाऱ्या यातना
मी नाही सोसू शकणार !
हातात हात घालून
चालू लागण्यापूर्वीच
मी हे कबूल केलेलं
आणि तू स्वीकारलेलं
किती सहज विसरलास !
***





**बंध**

‘तुझे माझे बंध मावळत गेले
मीच सखी तुला दार बंद केले !

वाटले तुला मी साफ विसरले
जाणारे तुफान सहज सोसले !

गेलीस वाटले तूही विसरूनी
यायची नाहीस पुन्हा परतुनी

आज अनाहुत कशी ग आलीस
दार बंद होते, तरीही आलीस !’


‘इथेच होते मी, कुठे गेले होते ?
दोघींमध्ये सखी, दार कुठे होते ?’
***





**नकोशी**

आयुष्य काळवंडून टाकणारी वेदना
किती असह्य आहे
असं म्हणत
तिला दूर लोटण्याऐवजी
मी गोंजारतेच आहे !
असहाय्यतेच्या जाणिवेनं
मूक आक्रंदन करताना
मी तिचाच आधार घेते आहे
अनेक सुखाच्या क्षणांना
वाट करून देत
ती जाऊ लागते
तेव्हा मीच तिला धरून ठेवते
नि हरवलेल्या सुखासाठी
तिलाच बोल लावते !
पाण्यासारख्या वाहात राहिलेल्या
निरर्थक आयुष्याला
खरं तर वेदनेमुळेच अर्थ आहे
अन तरीही
ती नकोशी आहे, नकोशीच आहे !
***





## अरूप तोवर

अरूप तोवर
असीम असते प्रीती
आकाशावर जीव जडवते माती !

मुग्ध रहावी
प्रीतकळी हृदयात
गंध मुरावा
खोल आतल्या आत
पाकळयांसही कळू नये एकांती

स्पर्श न व्हावा
शब्दांचा ओठांना
अर्थ लपावा
ना कळता गीतांना
सूर रहावे तसेच अधरावरती !

तृप्त सुखाने
ओंजळ भरुनी यावी
मुक्त चांदणी
मनामधे उगवावी
प्रीतसागरा येत रहावी भरती !
***





**संधी**

मी कोसळतो त्या प्रत्येक वेळी
सहज प्रेमाने तू माझ्यासाठी जमीन झालीस !
नि मग तशीच रीत पडली !
मला कोसळायची सवय झाली
तसं तुलाही भाग पडत गेलं
माझ्यासाठी जमीन होणं !
तुझ्यावर सहनशील क्षमेचे
नि प्रेममय त्यागाचे आरोपण करीत
आपला कोसळण्याचा हक्क
मी आबाधित राखू पहातो
तेव्हा कधी कधी
मला माझीच कीव येते !
वाटतं
कधी तरी तू जमीन होणं नाकारायला हवं होतंस !
उद्रेक उरात न दडपता
कोसळलीच असतीस कधी
तर मीही सहजप्रेमाने
झालो असतो जमीन तुझ्यासाठी !
निदान
तू मला तशी संधी द्यायला हवी होतीस !!
***






## हुरहुर

लावुनिया आधी मना हुरहुर
वेल्हाळ काहुर माजविसी

सोसता येईना सुटता येईना
एकही मार्ग ना दाखविसी

किती किती भास भोवती भरले
मनी दाटलेले अब्द अब्द

अशा वेळी सांग काय करायचे
कुठे शोधायचे भले शब्द ?
***





**नाइलाज**

एखादं वर्णन ऐकल्यावर
डोळ्यांसमोर उभं राहणारं चित्र
आणि
ते चित्र पाहून केलेलं त्या चित्राचं वर्णन
यात असतं तसं अंतर
आपण एकमेकांना समजून घेण्यात पडतं !
पण त्याला काय इलाज आहे ?
एकमेकांना हात देता येईल इतके
जाणीवांचे किनारे जवळ असत नाहीत
आणि
समजुतीची शिडंही
आपापल्या नावा
किनाऱ्यापर्यंत पोचवण्याइतकी
समर्थ असत नाहीत !
***






**कणिका**

आकाश मघा पिवळे
मग निळे सावळे
नि जराशाने काळे काळे !
*

क्षितीजापलिकडे
लखख उजेड
तरी
अलिकडे अंधारलेलेच !
*

सुगंधाने काठोकाठ भरलेले फूल
मधोमध
आणि भोवती
पानेच पाने नुसती !
***





**तहान**

अथांग सागर समोर माझ्या
अन मी तहानलेली
गळकी घागर कवेत माझ्या
अन मी आसुसलेली !

कितीकदा मी भरू पाहिली
घागर भरली नाही
पाणी प्याले कितीकदा मी
तहान सरली नाही ! !
**

सर्वांसंगे मीहि सोडली
कबूतरे आकाशी
सर्वांसंगे मीहि घातली
त्यांना शीळ जराशी

कबूतरांचा खेळ तसा तो
मुळी वेगळा नव्हता
खेळ खेळले मीही त्याचा
फक्त दिलासा होता !
***





## मोर तुझा

लाजरिचे रोप तुझे
फुलातल्या दवापरी
पण नाचे मोर तुझा
थुई थुई रानभरी

बावरले मौन तुझे
रंग निळा नभातला
पण हिरवा ध्यास तुझा
कोंभ जणू रुजलेला

मंदगती चाल तुझी
झुळुक जणू हलकीशी
मन-पक्षी पण जाई
झेपावत गगनाशी

धुंद तुझा बकुळ-गंध
मन-कुपीत लपवशील
पण गंधित रंग तुझा
सांग कसा झाकशील?
***






**शब्दघट**

मनातील आशयाच्या जलाशयात
उठलेली एखादी आर्जवी लहर
हळूवारपणे पकडून
शब्दघटात बंदिस्त करायची
घटाला सुंदर रंग द्यायचा
वाटलं तर नक्षी कोरायची
वर थोडा गंध शिंपायचा
मग अलिप्तपणे दूर व्हायचं
नि मन भरून
मोकळं मोकळं व्हायचं !
**

मनातील आशयाच्या जलाशयात
उठलेल्या अनावर लहरीस
तत्परतेने पकडून
शब्दघटात बंदिस्त करायचं
कधी त्यांना शिरावर घेऊन मिरवायचं
तर कधी तसंच जपून ठेवायचं !
दाखवू की न दाखवू करत
कधी दाखवायचं
तर कधी लपवायचं
लपाछपी खेळता खेळता
एक दिवस उमगायचं
पकडलं एवढं पण निसटलं केवढं !
**





मनातील आशयाच्या जलाशयात
उठलेली प्रत्येक अस्वस्थ लहर
प्रयासानं पकडून
शब्दघटात बंदिस्त करायची
आणि नार्सिससप्रमाणं
मधून मधून त्यात डोकवायचं !
कधी सुखवायचं
कधी दुखवायचं
त्यापेक्षा
आशयाच्या काठाशी बसून
लहरींचा लहरी खेळ
त्यांच्या अंतरंगातील कल्लोळ
आणि व्याकुळ तडफड
अलिप्तपणेच अनुभवली तर ?
**


मनातील आशयाच्या जलाशयात
उठलेली प्रत्येक आतूर लहर
तितक्याच उत्कटपणे पकडून
शब्दघटात बंदिस्त करायची
केवढी ही धडपड !
वाहूनच जायचेत ना
अखेर सारे घट
असीम अनंत
कालप्रवाहात ?
**





## दिलासा

पाणी आटून गेलेल्या
नदीच्या पात्रासारखं
आयुष्य केविलवाणं झालेलं
खळखळाट संपलेला
मन उदास झालेलं !
अशा वेळी
कुठे तरी साचलेल्या पाण्यात
तुझं आभाळ डोकावलं
आता मी थोडी सुखावलीय
पण तुझं आभाळ
मला पेलवेल ना ?
***





## वाट


जन्म-मृत्यू जोडणारी
वाट आयुष्य नावाची
दिसे वेगळी प्रत्येक
ज्याच्या त्याच्या सरावाची

सरावाची खरी पण
कुठे माहिती असते
फक्त चालावे आपण
कसे किती तीच नेते

तीच नेते, सवे येते
दर पाउलामागुती
गुंडाळत उलगडे
दर पाउलापुढती

वाट पाउलापुढती
तेवढीच दिसे फक्त
कुठे किती जावयाचे
सारे सारे अंधारात

अंधारात सरे वाट
सुरू होते अंधारात
गुंडाळत उलगडे
वाट पायात पायात





पायातल्या वाटेवर
हाती जाणीवेचा दिवा
हवा तेवढा उजेड
ज्याचा त्याने मिळवावा
***





## मनाच्या रंगमंचावर

मनाच्या रंगमंचावर
जुन्या आठवणी फेर धरून नाचू लागल्या
की कितीतरी वेळ
त्या खेळात हरवून जायला व्हायचं !
एक दिवस अचानक तू आलीस
पंख लावल्यासारखी अलगद उतरलीस
माझ्यासमोर !
भरभरून सांगू लागलीस काहीबाही !
कशाचा तरी वेध घेणारी
तुझी आरपार नजर,
जमिनीला न टेकलेली उत्सुक पावलं,
वाऱ्याशी खेळणारे केस,
आणि अवघ्या देहावरची प्रसन्न झळाळी !

मी तुझ्याकडे पाहातच राहिले
तुझे शब्द मला ऐकू येत नव्हते.
तू गदगदा हलवलंस तेव्हा मी भानावर आले !
पण हळूहळू तूही त्या नाचात सामील झालीस
नाचाचा केंद्रबिंदू असल्यासारखी
आणि बघता बघता विंगमधे निघून गेलीस !
रिकाम्या रंगमंचावर दिसत होता फक्त
मोहक स्वप्नांच्या रंगीत चित्रांचा
धूसर होत चाललेला पडदा !





मी संथपणे उठले कुठंतरी जावं म्हणून !
तुझंच रूप आठवत आरशात पाहिलं.
माझ्या केसांची रुपेरी छटा
अधिक गडद झाल्याचं
मला प्रकर्षानं जाणवलं !
***





**मला भेटले..**

मला भेटले आकाश
चंद्रसूर्य ज्याचे नेत्र
दीर्घ बाहू पसरुनी
धरी जगावरी छत्र

मला भेटले आकाश
ज्याचे हृदय विशाल
मनी ठेवुनिया रात्र
जगा देई उषःकाल


मला भेटले आकाश
थोडी त्याच्याशी बोलले
पाय पाहिले त्याचेही
क्षितिजाशी टेकलेले !
***





## अनुभव

सुखाचा कवडसा
गच्च मुठीत धरून ठेवून
मी साऱ्यांना टुकटुक करायला सरसावले
पण
बाहेरच्या लख्ख उजेडात
हातातला कवडसा अलगद केव्हा मिसळून गेला
ते कळलंच नाही !
सुखाचं एक असो !
पण-
एकसारखं काळीज पोखरणारा दुःखाचा भुंगा
माझ्याच मागे का ?
म्हणून जखमा हातात घेऊन
तक्रार करायला निघाले
तर ऐकू शकणारा प्रत्येकजण
आपलाच बचाव करताना
घायाळ होत असलेला !
उद्ध्वस्त करणारं दुःख काय ते माझंच
असं प्रत्येकजणच म्हणू लागला
तेव्हा बाहेरच्या मिट्ट काळोखात
माझ्या दुःखाची अंधारपोकळीही
मला दिसेनाशी झाली !!
***





# ओंजळ भरली

ओंजळ भरली मन रिते झाले
तुला द्यावे असे शब्द हाती आले

अधीर होऊन तुझ्यापाशी आले
देऊनिया सारे मीच तृप्त झाले

तृप्तीची झळाळी मनावर आली
आणि पुन्हा नवी चाहुल लागली

भारावले मन पुन्हा आर्त झाले
आणि शब्दासाठी वेडेपिसे झाले !
***





**क्षण**

पोटच्या पोरासारखे
हृदयाशी जपलेले क्षण
वर्तमानाचे पाणी
नाकातोंडात जाऊन
जीव गुदमरायला लागल्यावर
पायाखाली घ्यावेच लागतात !
पण
काही मायावी क्षण
आपले पायच असे जखडून ठेवतात
की पुढचा सगळा प्रवास ठरतो
केवळ एक असह्य ओढाताण !
***





**प्रकाशाचे नाग**


दूध घालून मीच पोसलेत
अंधाराला डसणारे
प्रकाशाचे नाग !
पुंगी वाजवत मीच झुलवत ठेवलंय
त्यांना सभोवती !
झोपेतही टक्क डोळे उघडे ठेवून
प्रकाशातच वावरत असते.
प्रकाशाशी माझे नाते
असे दृढ झाले आहे !
आता मी टाळूच शकत नाही
प्रकाशाचे देणे घेणे.
अंधारात जाऊ लागताच
फुत्कारू लागतात
हे पोसलेले नाग
मग मी नकळत मागे फिरते
आतिल निरामय अंधार
मला केव्हाचा साद घालतोय
पण तिथे पोचण्याचा मार्ग
प्रकाशाने असा रोखून धरलाय !!
***





## आठवणी

आठवणींना
‘उद्या’ चे आकाश नसते !
नसते ‘आज’ ची जमीन !
पण एवढं बरं
की आठवणींना
आठवणींचेच पंख असतात !
वाटेल तेव्हा
मनाच्या आकाशात
त्या विहार करू शकतात
आणि
दिलंच हकलून
तर उडूनही जाऊ शकतात !!
***





## माझ्याही पल्याड

अल्याडापासून पल्याडापर्यंत
भरून राहिला माझाच आकांत !

मन केले मोठे समज देऊन
तरी फिरे नेत्र माझेच घेऊन

पहाता हे जग माझ्याच डोळ्यांनी
भरलेले दिसे माझ्याच खेळांनी

मीपण माझे हे कधी सरायचे
माझ्याही पल्याड कधी जगायचे ?
***






**कणिका**

इतकी दूर नाहीस
की तुला चांदणं मानू !
इतकी जवळ नाहीस
की आशयासाठी शब्द मागू !
**

पारिजात बहरलेला होता
तेव्हा हलकीशी झुळुकही
पुरेशी व्हायची.
बहर खाली झुकून
गंधसडा घालायचा
नि मातीला गंध देऊन
पुन्हा फुलायचा !!
**

तू अशी निराकार हसू नकोस
चांदणं देताना
आकाश नाकारू नकोस !
***






## छंद

ओल्या पाऊलखुणांची
साद झाली मनभर
आणि वाटेला फुटले
नव्या दिशेचे अंकुर !

ओल्या पाऊलखुणांनी
बोट धरुनिया नेले
नाते माझ्या परिघाचे
थेट नभाशी जोडले !

ओल्या पाऊलखुणांचा
छंद जिव्हारी लागला
अर्थ जगण्याचा सोपा
अदृष्टात भोवळला

तरी मोजू जाते खोली
अधांतरी आकाशाची
साथ लाभेल ना मला
ओल्या पाऊलखुणांची ?
***





**वा !**


कितीक असे राहिलेत श्वास
आतले आत
ज्यांचे निश्वास झाले नाहीत
कितीक असे राहिलेत  भास
मनाचे मनात
ज्यांना उद्गार लाभले नाहीत !
म्हणूनच
माझ्या आशयाच्या ढगांना
जेव्हा तू माझ्या मनातला आकार देतेस
तेव्हा
मी एक तृप्त निश्वास सोडते
आणि सहज उद्गारते
वा !
***





## तरीही

माझ्या पार्थिव शरीराची
चिमुटभर राख
तू पंचमहाभूतांच्या स्वाधीन केलीस
आणि
चैतन्याचे बीज रोवलंस !
खरं तर आता मी पार्थिवाचा विचार करू नये !
पण तू लावलेल्या बीजाला
आता हजार डोळे फुटले आहेत
आणि देठाचा बुंधा होताना
आत मनही आकार घेतं आहे !
माझ्या स्मृती-प्रीत्यर्थ
एखादी अचेतन फरशी
किंवा पायरी बनविण्याऐवजी
माझ्या स्मृतीला तू वृक्षाचं रूप देऊ केलंस
तेव्हा भारावून पावसाच्या सरी खाली कोसळल्या !
आता उंच विस्तारत चाललेल्या
माझ्या फांद्यांचे हात पसरून
मी पावसाला आवाहन करीत राहीन !
तुझी हीच अपेक्षा होती ना ?
मला तुझा अभिमान वाटतो
पण माझ्या छायेत रोवलेली
ही नामोनिशाणी मला रुतते आहे !
‘आपलं नाव राहावं’
या अभिलाषेइतकाच
‘ते राहूच नये’ हा हट्टही पार्थिव आहे
तरीही---
***





**समाधान ?**

समाधानाचं शिखरंच
निसरडं असतं
की मनाचेच पाय अस्थिर ?
शिखरावर
ध्वज रोवून होत नाही तोवरच
कसा होतो कडेलोट
नि कितीही नाकारलं
तरी घ्यावाच लागतो
अनाहूत विषादाचा घोट !
**

दूर गेलेल्या
कुंपणाकडे पाहात
सुस्कारा सोडून
मी धावायला सुरवात करणार
तोच जाणवलं
की आतापर्यंत
अदृश्य असलेल्या
दुसऱ्याच एका कुंपणानं
आतून बाहेर येत
मला केव्हाच वेढून टाकलं आहे !
***





# तोवर

असेल अथवा नसेल श्रावण
रिमझिमतो मनमेघ सावळा
तोवर शिंपुन घेऊ अंगण

असेल अथवा नसेल श्रावण
वेल जुईची बहरत आहे
फुले तोवरी घेऊ वेचुन !

असेल अथवा नसेल श्रावण
हिंदोळ्यावर झुलते गाणे
तोवर त्याला बांधू पैंजण

असेल अथवा नसेल श्रावण
इंद्रधनू तर मनात आहे
तोवर रंगुन जाऊ आपण !
***





## काहीसे

नको शब्दांचाही स्पर्श
असे मनात काहीसे
दिले मौनाचे कोंदण
तरी येतात उसासे !

काय करावे कळेना
मन मिटता मिटेना
हात देऊ केला तरी
काही काही गवसेना !

याला काळोख म्हणू की
म्हणू आतला उजेड ?
मनी लपले तयाला
कसे उघडू कवाड ?


नको म्हटले तरीही
चित्त वेधते तिकडे
आणि सांगू जाता काही
शब्द ओठांमधे अडे ! !
***





**सोबत**


ऋतूंनी आपल्या दिशा
आणि वेळाही बदलल्या
तशी पक्ष्यांची उत्सुक गाणी
गोंधळून गेली !
त्यांना शब्दांच्या मर्यादा नव्हत्याच कधी
नव्हताच कधी कुठला पार्थिव बंध !
तरी
ऋतूंच्या निःसंग असण्याचीही
सोबत वाटायची
पक्ष्यांच्या गाण्याला !
जसा-
मुक्त भरारी घेताना
गृहित असतो आधार निराकार आकाशाचा !
***





**जाणीव**

आपण रोज पहातो
तेवढा एकच सूर्य नाही
आपण गाणी रचतो
तो चंद्रही एकमेव नाही
आपल्याला माहिती आहेत
अशा अनेक ग्रहमाला आहेत
नि अनेक आकाशगंगा सुद्धा !
हे मला समजलं तेव्हा मी म्हटलं,
असतील- असू देत
पण माथ्यावरचं
हे अथांग निळं आकाश
ते सुद्धा एकच एक नाही
हे कळलं तेव्हा मात्र
मी कासावीस झाले
कारण
आता माझ्या नगण्यतेला
काही सीमाच उरली नाही !
***



**आसावरी श्रीनिवास काकडे**

**बी.कॉम., एम.ए. मराठी,**

**एम.ए. तत्त्वज्ञान**



**प्रकाशित पुस्तके-**

**गद्यलेखन-**

*‘कवितेभोवतीचं अवकाश’ (लेखसंग्रह)

*ईशावस्यम् इदं सर्वम्: एक आकलन-प्रवास’ (तत्त्वज्ञान)

* ‘अथांग’- (अनुवादित कादंबरी) बिन्द्या सुब्बा यांच्या ‘अथाह’ या साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त मूळ नेपाळी कादंबरीचा मराठी अनुवाद.

* आनंदी गोपाळ (कादंबरी- संक्षिप्त आवृत्ती) श्री. ज. जोशी यांच्या आनंदी गोपाळ या कादंबरीचे मुलांसाठी संक्षिप्तीकरण

**कवितासंग्रह-**

मराठी- ९ :

‘आरसा’, ‘आकाश’, ‘लाहो’, ‘मी एक दर्शनबिंदू’, ‘रहाटाला पुन्हा गती दिलीय मी’, ‘स्त्री असण्याचा अर्थ’, ‘उत्तरार्ध’, ‘व्यक्त-अव्यक्ताच्या मध्यसीमेवर’ आणि ‘भेटे नवी राई’

हिन्दी- ३

‘मौन क्षणों का अनुवाद’, ‘इसीलिए शायद’, आणि ‘मेरे हिस्से की यात्रा’- (स्वतःच्या निवडक मराठी कवितांचा हिन्दी अनुवाद. या हिंदी अनुवादाचा तमिल अनुवाद प्रकाशित झाला आहे.)

अनुवादित- ४



* ‘बोल माधवी’ (चन्द्रप्रकाश देवल यांच्या ‘बोलो माधवी’ या हिन्दी कवितासंग्रहाचा अनुवाद),

* ‘तरीही काही बाकी राहील’ (विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या निवडक हिन्दी कवितांचा अनुवाद),

* ‘लम्हा लम्हा’ (दीप्ति नवल यांच्या ‘लम्हा लम्हा’ या कवितासंग्रहाचा अनुवाद),

* ‘तू लिही कविता’ (डॉ. दामोदर खडसे यांच्या ‘तुम लिखो कविता’ या कवितासंग्रहाचा अनुवाद)

बालगीतसंग्रह- ५ : ‘टिक टॉक ट्रिंग’, ‘अनु मनु शिरू’, ‘जंगल जंगल जंगलात काय?’(इसाप गाणी), ‘भिंगोऱ्या भिंग’, आणि ‘ऋतुचक्र’

ब्लॉग्ज- ‘ब्लॉग, एक नवी सुरुवात’ या ब्लॉगमधे विषयानुसार बनवलेले दहा ब्लॉग्ज एकत्रित.

(http://www.asavarikakade.blogspot.com)

**काही महत्त्वाचे पुरस्कार-**

* ‘बोल माधवी’- साहित्य अकादेमी, नवी दिल्लीचा अनुवाद पुरस्कार २००६

* ‘इसीलिए शायद’- केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्लीचा ‘हिंदीतर भाषी हिंदी लेखक पुरस्कार

* ‘मेरे हिस्से की यात्रा’- महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमीचा संत नामदेव पुरस्कार

* ‘आरसा’ आणि ‘मी एक दर्शनबिन्दू’ या संग्रहांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार

* बालसाहित्यासाठी औरंगाबादच्या परिवर्तन संस्थेचा कै. ग.ह. पाटील पुरस्कार





* ‘कवितेभोवतीचं अवकाश’- आचार्य अत्रे स्मृति प्रतिष्ठान केशवकुमार आचार्य अत्रे पुरस्कार

* ‘ईशावस्यम् इदं सर्वम्...’- सार्वजनिक वाचनालय, नाशिकचा ग. वि. अकोलकर पुरस्कार.

* एकूण लेखनासाठी गो. नी.दांडेकर स्मृति ‘मृण्मयी’ पुरस्कार,

* पुणे मराठी ग्रंथालय, पुणेचा साहित्य सम्राट न. चिं. केळकर पुरस्कार


**इतर सन्मान**

* इयत्ता सातवी ते एम. ए. पर्यंतच्या विविध वर्गांच्या अभ्यासक्रमात व विविध संपादित संग्रहांमधे वरील संग्रहांमधील कवितांचा समावेश.

* आकाशवाणी, नवी दिल्ली तर्फे आयोजित सर्वभाषी कविसंमेलनात(२००२) मराठीचे प्रतिनिधित्व


* हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग (अलाहाबाद) द्वारा ‘सम्मेलन सम्मान’- २००४


* अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह अनेक महत्त्वाच्या साहित्यिक कार्यक्रमांमधे कवितावाचन, निबंधवाचन, भाषण अशा प्रकारचा सहभाग.



**आसावरी काकडे यांची ई साहित्यवरील इतर ५ पुस्तके**


**कव्हरवर एकच क्लिक केले की पुस्तक उघडेल**










झुल्यावर बसून
उंच उंच झोके घेताना
कधी कधी
आकाश अगदी जवळचं,
मायेची पाखर घालणाऱ्या
आईसारखं वाटतं
तर कधी
खूप दूरचं, परकं
निर्गुण निराकार वाटतं !
झुल्याच्या झुलव्या बरोबर
मनाचेही आकार बदलत असतात
त्याला आकाश तरी काय करणार ?

